**जळगांव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील तापी नदीवरील मौजे पिंप्री, शिरागड व पथराळे, ता. यावल, येथील प्रस्तावित असलेल्या तीन वाळू घाटांकरिता दि. १९/१०/२०२२ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---

जळगांव जिल्हयातील यावल तालुक्यातील तापी नदीवरील मौजे पिंप्री, शिरागड व पथराळे, ता. यावल, येथील प्रस्तावित असलेल्या तीन वाळू घाटांकरिता दि. १९/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय, यावल , ता. यावल जि. जळगांव येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्र. BO/JD (WPC)/PH/B-२२१०१०-FTS-००१५ दि. १०/१०/२०२२ अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१) जिल्हादंडाधिकारी, जळगांव किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे प्रतीनिधी) - सदस्य

३) उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव - समन्वयक

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक 9 मे 2022 च्या अधिसूचनेनुसार मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे दि.१८/१०/२०२२ रोजीचे पत्र क्र/गौणख/ई-कावि/२०२२/८/२६/१०६४, नुसार उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, अमळनेर, फैजपुर व एरंडोल यांना सदरील जनसुनावणीस अध्यक्ष म्हणून प्राधिकृत करण्यात आले.

श्री. अजय चव्हाण, उप-प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे प्रतीनिधी व उपस्थित असलेल्या नागरिकांचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनूमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

जळगांव जिल्हयातील यावल तालुक्यातील ३ वाळू घाटांमधून वाळूचा उपसा करण्याकरीता प्रकल्प प्रवर्तक अप्पर जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दि.०९/०९/२०२२ रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी असे नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

म.प्र.नि. मंडळाकडे लोकसुनावणी घेण्याबाबत प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या परवानगीने दि.१९/१०/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता पर्यावरण विषयक लोकसुनावणी आयोजीत करण्याबाबत निश्चित करण्यात आले. नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि.१७/०९/२०२२ रोजीच्या मराठी दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया मध्ये सदरच्या लोकसुनावणीबाबत सुचना प्रकाशित करण्यात आली होती. तसेच प्रकल्पाधारकाने प्रस्तावित प्रकल्पाच्या सादर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल / पर्यावरण व्यवस्थापन योजना व कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) यांच्या प्रती खालील शासकीय कार्यालयामध्ये इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता ठेवण्यात आल्या होत्या;

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव.
४) उप-विभागीय कार्यालय, अमळनेर / फैजपूर / एरंडोल जि. जळगांव.
५) तहसिल कार्यालय, अमळनेर / यावल / एरंडोल जि. जळगांव.
६) नगरपरिषद , अमळनेर / यावल / एरंडोल जि. जळगांव.
७) गट विकास अधिकारी , पंचायात समिती कार्यालय, अमळनेर / यावल / एरंडोल जि. जळगांव.
८) ग्रामपंचायत कार्यालय उत्राण, हनुमंतखेडे सिम, टाकरखेडा ता. एरंडोल, पिंप्री, शिरागड, पथराळे, ता. यावल व जळोद ता.अमळनेर जि. जळगांव.
९) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव, हॉल ए, तिसरा मजला, जुने बी. जे. मार्केट,जळगांव – ४२५००१.
१०) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्रबंक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
११) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
१२) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
१३) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाइन्स,नागपूर-४४०००१.

तद्नंतर जळगांव जिल्हयातील यावल तालुक्यातील ३ वाळू घाटांबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी सविस्तर अहवाल सादर केला. तसेच वाळू उपसा करतांना प्रदूषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

सादरीकरणांनतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत त्यांचे मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्तावित प्रकल्पाबाबत एक लेखी निवेदन ई-मेलद्धारे प्राप्त झालेले असल्याचे सांगितले. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव, गाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | **श्री चंद्रभान लक्ष्मण पाटील, रा. पथराळे.**<br>वाळू वाहतूक केव्हा करण्यात येईल ? | **प्रकल्प प्रर्वतक- जिल्हा खनिकर्म अधिकारी**<br>शासनाच्या मार्गदर्शकतत्वानुसार सकाळी ६ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंतच वाळू वाहतूक करण्याबाबत निर्देश दिले आहे. |

| | | |
|---|---|---|
| २ | **श्री. सुधाकर नारायण पाटील, पोलिस पाटील, शिरागड.**<br>वाळू वाहतूक करतांना वाहने सावकाश चालविण्यात यावीत ? | **प्रकल्प प्रर्वतक –जिल्हा खनिकर्म अधिकारी**<br>शासनाच्या मार्गदर्शकतत्वानुसार वाहनांचा वेग मर्यादित करण्यात आलेला आहे. |
| ३ | **श्री. प्रताप पंडीतराव सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य, पथराळे.**<br>घरकूल योजनेसाठी वाळू घाट उपलब्ध होईल का ? | **प्रकल्प प्रर्वतक –जिल्हा खनिकर्म अधिकारी**<br>वाळू घाटाचे लिलाव न झाल्यास घरकूल योजनेसाठी वाळू उपलब्ध करुन देणेबाबतची तरतूद असल्याचे सांगितले. |

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सुचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितां कडून नंतर प्रश्न विचारण्याबाबत कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या अनुमतीने समन्वयक यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे, शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रर्वतक, स्थानिकांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

**(अजय चव्हाण)**
समन्वयक
तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
जळगांव

**(कैलास कडलग)**
अध्यक्ष
तथा
उपविभागीय अधिकारी व
दंडाधिकारी, फैजपुर ता.यावल
जि.जळगांव.

**जळगांव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील तापी नदीवरील मौजे जळोद, ता. अमळनेर, येथील प्रस्तावित असलेल्या एका वाळू घाटाकरिता दि. १९/१०/२०२२ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

जळगांव जिल्हयातील अमळनेर तालुक्यातील तापी नदीवरील मौजे जळोद, ता. अमळनेर येथील प्रस्तावित असलेल्या एका वाळू घाटाकरिता दि. १९/१०/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वाजता उपविभागीय कार्यालय, अमळनेर, ता. अमळनेर, जि. जळगांव येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्र. BO/JD (WPC)/PH/B-२२१०१०-FTS-००१५ दि. १०/१०/२०२२ अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, जळगांव<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) | प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे प्रतीनिधी) | - सदस्य |
| ३) | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव | - समन्वयक |

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक ९ मे २०२२ च्या अधिसूचनेनुसार मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे दि.१८/१०/२०२२ रोजीचे पत्र क्र/गौणख/ई-कावि/२०२२/८/२६/१०६४, नुसार उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, अमळनेर, फैजपुर व एरंडोल यांना सदरील जनसुनावणीस अध्यक्ष म्हणून प्राधिकृत करण्यात आले.

श्री. अजय चव्हाण, उप-प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे प्रतीनिधी व उपस्थित असलेल्या नागरिकांचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनूमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

जळगांव जिल्हयातील अमळनेर तालुक्यातील एका वाळू घाटामधून वाळूचा उपसा करण्याकरीता प्रकल्प प्रवर्तक अप्पर जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दि.०९/०९/२०२२ रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी असे नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या

भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

म.प्र.नि. मंडळाकडे लोकसुनावणी घेण्याबाबत प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या परवानगीने दि.१९/१०/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वाजता पर्यावरण विषयक लोकसुनावणी आयोजीत करण्याबाबत निश्चित करण्यात आले. नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि.१७/०९/२०२२ रोजीच्या मराठी दैनिक 'सकाळ' व इंग्रजी दैनिक 'द टाइम्स ऑफ इंडिया' मध्ये सदरच्या लोकसुनावणीबाबत सुचना प्रकाशित करण्यात आली होती. तसेच प्रकल्पधारकाने प्रस्तावित प्रकल्पाच्या सादर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल / पर्यावरण व्यवस्थापन योजना व कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) यांच्या प्रती खालील शासकीय कार्यालयामध्ये इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या;

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव.
४) उप-विभागीय कार्यालय, अमळनेर / फैजपूर / एरंडोल जि. जळगांव.
५) तहसिल कार्यालय, अमळनेर / यावल / एरंडोल जि. जळगांव.
६) नगरपरिषद , अमळनेर / यावल / एरंडोल जि. जळगांव.
७) गट विकास अधिकारी , पंचायात समिती कार्यालय, अमळनेर / यावल / एरंडोल जि. जळगांव.
८) ग्रामपंचायत कार्यालय उत्राण, हनुमंतखेडे सिम, टाकरखेडा ता. एरंडोल, पिंप्री, शिरागड, पथराळे, ता. यावल व जळोद ता.अमळनेर जि. जळगांव.
९) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव, हॉल ए, तिसरा मजला, जुने बी. जे. मार्केट,जळगांव – ४२५००१.
१०) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्रबंक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
११) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
१२) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
१३) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाइन्स,नागपूर-४४०००१.

तद्नंतर जळगांव जिल्हयातील अमळनेर तालुक्यातील एका वाळू घाटाबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी सविस्तर अहवाल सादर केला तसेच वाळू उपसा करतांना प्रदूषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

सादरीकरणांनतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत त्यांचे मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्तावित प्रकल्पाबाबत एक लेखी निवेदन ई-मेलद्धारे प्राप्त झालेले असल्याचे सांगितले. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव, गाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | **श्री. ज्ञानेश्वर पांडूरंग चौधरी, रा. जळोद.** वाळू घाटाची खोली किती असेल व वाळू वाहतूकीसाठी SMS यंत्रणा प्रणाली आहे का? | **प्रकल्प प्रवर्तक – जिल्हा खनिकर्म अधिकारी** वाळू घाटाची खोली ३ मीटर पर्यंत असेल तसेच वाळू वाहतूकीसाठी महा खनिज प्रणाली वरुन SMS तयार करुन बारकोड युक्त वाहतूक केली जाईल व वाळू घाटाजवळ CCTV बसविण्यात येतील. अवैध वाळू उत्खनांवर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २ | **श्री. ज्ञानेश्वर पांडूरंग चौधरी, रा. जळोद.**<br>वाळू उपसा करण्याची वेळ काय, रात्रीपण वाळू वाहतूक चालते, अनेक तक्रारी करण्यात आल्या परंतू कोणतीही कारवाई होत नाही ? | **प्रकल्प प्रवर्तक – जिल्हा खनिकर्म अधिकारी**<br>शासनाच्या मार्गदर्शकतत्वानुसार वाळू उपसा व वाहतूक सकाळी ६ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत तसेच अवैध वाळू उपसा व अवैध वाळू वाहतूकीवर पथक नेमून कारवाई करण्यात येईल. |
| ३ | **श्री. हरेश बाबूराव कोळी, रा. जळोद.**<br>झाडे केव्हा लावण्यात येईल, वाळू वाहतूकीमूळे शेतात जाण्यासाठी त्रास होतो, कच्च्या रस्त्यामूळे धुळ उडते, पाणी फवारणी होत नाही ? | **प्रकल्प प्रवर्तक – जिल्हा खनिकर्म अधिकारी**<br>ग्रामपंचायतीच्या गायरान व पडीक जमिनीवर झाडे लावण्यात येतील तसेच रस्त्यावर धुळ उडू नये त्यासाठी लिलाव धारकास रस्त्यावर पाणी फवारणीच्या सुचना देण्यात येतील. |

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सुचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितां कडून नंतर प्रश्न विचारण्याबाबत कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या अनुमतीने समन्वयक यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे, शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रर्वतक इत्यादीचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून सदर पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीस संस्थगित करण्यात आली.

**(अजय चव्हाण)**
समन्वयक
तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
जळगांव

**(सीमा अहिरे)**
अध्यक्षा
तथा
उपविभागीय अधिकारी व
दंडाधिकारी,अमळनेर,ता.अमळनेर
जि.जळगांव.

**जळगांव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील गिरणा नदीवरील मौजे उत्राण अ.ह.-१, उत्राण अ.ह.-२, हनुमंतखेडे सिम भाग १, हनुमंतखेडे सिम भाग २, टाकरखेडा-१ व टाकरखेडा-२, ता. एरंडोल, येथील प्रस्तावित असलेल्या सहा वाळू घाटांकरिता दि. १९/१०/२०२२ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---

जळगांव जिल्हयातील एरंडोल तालुक्यातील गिरणा नदीवरील मौजे उत्राण अ.ह.-१, उत्राण अ.ह.-२, हनुमंतखेडे सिम भाग १, हनुमंतखेडे सिम भाग २, टाकरखेडा-१ व टाकरखेडा-२, ता. एरंडोल येथील प्रस्तावित असलेल्या सहा वाळू घाटांकरिता दि. १९/१०/२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजता उपविभागीय कार्यालय, एरंडोल , ता. एरंडोल जि. जळगांव येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्र. BO/JD (WPC)/PH/B-२२१०१०-FTS-००१५ दि. १०/१०/२०२२ अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१) जिल्हादंडाधिकारी, जळगांव - अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे प्रतीनिधी)

३) उप-प्रादेशिक अधिकारी, - समन्वयक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक 9 मे 2022 च्या अधिसूचनेनुसार मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे दि.१८/१०/२०२२ रोजीचे पत्र क्र/गौणख/ई-कावि/२०२२/८/२६/१०६४, नुसार उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, अमळनेर, फैजपुर व एरंडोल यांना सदरील जनसुनावणीस अध्यक्ष म्हणून प्राधिकृत करण्यात आले.

श्री. अजय चव्हाण, उप-प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे प्रतीनिधी व उपस्थित असलेल्या नागरिकांचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनूमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

जळगांव जिल्हयातील एरंडोल तालुक्यातील ६ वाळू घाटांमधून वाळूचा उपसा करण्याकरीता प्रकल्प प्रवर्तक अप्पर जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दि.०९/०९/२०२२ रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

---

समन्वयक यांनी असे नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

म.प्र.नि. मंडळाकडे लोकसुनावणी घेण्याबाबत प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या परवानगीने दि.१९/१०/२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजता पर्यावरण विषयक लोकसुनावणी आयोजीत करण्याबाबत निश्चित करण्यात आले. नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि.१७/०९/२०२२ रोजीच्या मराठी दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया मध्ये सदरच्या लोकसुनावणीबाबत सुचना प्रकाशित करण्यात आली होती. तसेच प्रकल्पाधारकाने प्रस्तावित प्रकल्पाच्या सादर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल / पर्यावरण व्यवस्थापन योजना व कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) यांच्या प्रती खालील शासकीय कार्यालयामध्ये इच्छुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता ठेवण्यात आल्या होत्या.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव.
४) उप-विभागीय कार्यालय, अमळनेर / फैजपूर / एरंडोल जि. जळगांव.
५) तहसिल कार्यालय, अमळनेर / यावल / एरंडोल जि. जळगांव.
६) नगरपरिषद , अमळनेर / यावल / एरंडोल जि. जळगांव.
७) गट विकास अधिकारी , पंचायात समिती कार्यालय, अमळनेर / यावल / एरंडोल जि. जळगांव.
८) ग्रामपंचायत कार्यालय उत्राण, हनुमंतखेडे सिम, टाकरखेडा ता. एरंडोल, पिंप्री, शिरागड, पथराळे, ता. यावल व जळोद ता.अमळनेर जि. जळगांव.
९) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव, हॉल ए, तिसरा मजला, जुने बी. जे. मार्केट,जळगांव – ४२५००१.
१०) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्रबंक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
११) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
१२) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
१३) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाइन्स,नागपूर-४४०००१.

तदनंतर जळगांव जिल्हयातील एरंडोल तालुक्यातील ६ वाळू घाटांबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी सविस्तर अहवाल सादर केला. तसेच वाळू उपसा करतांना प्रदूषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

सादरीकरणांनतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत त्यांचे मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्तावित प्रकल्पाबाबत एक लेखी निवेदन ई-मेलद्धारे प्राप्त झालेले असल्याचे सांगितले. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव, गाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | **श्री. भागवत पाटील, रा. उत्राण.**<br>झाडांची जोपासणा कोणामार्फत करण्यात येईल ? | **प्रकल्प प्रवर्तक–जिल्हा खनिकर्म अधिकारी**<br>झाडांची जोपासणा लिलावधारक तसेच ग्रामपंचायत यांच्याकडून करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | |
| २ | **श्री. भागवत पाटील, रा. उत्राण.**<br>ग्रामपंचायतमध्ये वाळू घाटासाठी ठराव घेतांना लिलाव झालेल्या वाळू घाटांच्या रक्कमेपैकी १५ ते २० टक्के निधी हा ग्रामपंचायतच्या विकास कामासाठी उपलब्ध करुन देण्यात येतो परंतू सदरचा निधी हा अद्यापपर्यंत प्राप्त झाला नसल्यामुळे गावातील नागरिकांकडून विचारणा होऊन विरोध होतो? | **प्रकल्प प्रवर्तक - जिल्हा खनिकर्म अधिकारी**<br>दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या वाळू धोरणानुसार ग्राम पंचायतीना रक्कम देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. |
| ३ | **श्री. प्रविण पाटील, सरपंच, टाकरखेडे.**<br>एक वर्षापुर्वी गौणखनिजातील १० ते १५ लाख रुपये अद्यापर्यंत मिळाले नाहीत? | **प्रकल्प प्रवर्तक - जिल्हा खनिकर्म अधिकारी**<br>दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या वाळू धोरणानुसार ग्राम पंचायतीना रक्कम देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. |
| | | |

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सुचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितां कडून नंतर प्रश्न विचारण्याबाबत कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या अनुमतीने समन्वयक यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे, शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रर्वतक, स्थानिकांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

**(अजय चव्हाण)**
समन्वयक
तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
जळगांव

**(विनय गोसावी)**
अध्यक्ष
तथा
उपविभागीय अधिकारी व
दंडाधिकारी, एरंडोल ता. एरंडोल
जि.जळगांव.